## चित्रकला स्पर्धा

कुलाबा वांद्रे सीप्झ या मेट्रो मार्गाविषयी नवीन पिढीच्या अपेक्षा आणि संकल्पना जाणून घेण्यासाठी



आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत अ गटात पाटकर विद्यालयाची सानिका वेंगुर्लेकर आणि ब गटात अनिशा जाधव यांनी पहिला क्रमांक पटकावला. तसेच, सेंट अग्नेस गर्ल्स हायस्कुलच्या सारा वाठके, डीसिल्वा हायस्कूलचा अथर्व जाधव, द ब्लॉसम एस. टी. इंग्लिश हायस्कूलची सुखदा सगदेव व हंसराज मोरारजी पब्लिक हायस्कूलच्या तेजस धालगडेने यांनीही या स्पर्धेत यश मिळवले. मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन व जवाहर बाल भवनच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत ९०० विद्यार्थी सहभागी झाले.